**अतिरिक्त सत्र न्यायाधीश यांचे न्यायालय,यवतमाळ**

**सत्र खटला क्र. ४३/२०२०**

**निशाणी क्र. ४७**

**महाराष्ट्र शासन** **सरकारी अभियोक्ता**

**..वि..**

**गणेश राजुरकर** **आरोपी.**

| | |
|---|---|
| **शासन तर्फे साक्षीदार क्र. २** | |
| मी याद्वारे शपथपूर्वक सांगतो की - | |
| माझे संपूर्ण नाव | घनश्याम नामदेवराव मेसरे |
| वय अंदाजे ४४ वर्षे | धंदा- नौकरी, पोलीस हवालदार, वाहतूक शाखा, यवतमाळ. |
| राहणार | यवतमाळ, ता. जि. यवतमाळ. |
| **सरतपासणी श्री. एन. एन. पांडे सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचेमार्फत शपथेवर सुरुः-** | |

सन २०१८ मध्ये मी वडकी पोलीस स्टेशन येथे वाहतूक पोलीस या पदावर कार्यरत होतो. दिनांक २६/०८/२०१८ रोजी सायंकाळी १७.४० वाजता मी कर्तव्यावर हजर होतो. त्यादिवशी बसस्थानकाकडून खैरी टि पॉईंटकडे पेट्रोलींग ड्यूटीवर १७.४० वाजता मी मोटार सायकलने जात असतांना, विवेक दरवरे यांच्या घरासमोरील रस्त्यावर आरोपी गणेश राजूरकर याने मला हात दाखवून थांबविले. मी थांबलो असता, तो दारु पिवून असल्याचे मला दिसले. मी त्याला काय अडचण आहे असे विचारले असता, तो "माझ्या घरा समोरुन गाड्या जात आहेत'', असे म्हणाला. आरोपीने असे सुध्दा सांगीतले की "माझ्यासोबत वाद झाला व एकाला मी मारले''. तेव्हा मी आरोपीला पोलीस स्टेशनला तक्रार देण्यास सांगीतले. मला पेट्रोलींग ड्यूटीवर जावू देण्यास मी आरोपीला सांगीतले. तेव्हा "पोलीसवाले मादरचोद आहे", "माजले" अशी शिवीगाळ केली. मी आरोपीला शिवीगाळ न करण्याबाबत म्हटले, तेव्हा आरोपीने जमिनीवरील दगड उचलला व मला मारण्यास आला. त्यावेळी तेथे हजर असलेले सुरज दरवरे यांनी आरोपीला धरले. त्यानंतर मी उपनिरीक्षक दिपक

कांक्रेडवार यांना फोन करुन घडलेली घटना सांगीतली. दिपक कांक्रेडवार यांनी लगेच गाडी व कर्मचारी पाठवतो, असे मला सांगीतले. त्यानंतर पुन्हा आरोपीने मला ''तुझ्या मायला झव'' अशी अश्लील शिवीगाळ केली व मला जिवाने मारण्याची धमकी दिली. त्यानंतर पोलीस गाडी व पोलीस कर्मचारी सुरज चिव्हाने, विलास जाधव, रुपेश जाधव व चालक जगदीश डेरे हे तेथे आले. त्यानंतर आम्ही आरोपीला गाडीमध्ये बसवून पोलीस स्टेशनला आणले. आरोपीला वैद्यकीय तपासणीकरीता पाठविले व त्याबाबतचे पत्र मी तयार केले. आता मला ते पत्र दाखविले, त्यावर माझी सही आहे, त्यातील मजकूर बरोबर आहे व **ते पत्र निशाणी क्रमांक ४८ वर आहे**. त्यानंतर मी आरोपीच्या विरोधात लेखी तक्रार दिली. ती तक्रार आता मला दाखवली, त्यावर माझी सही आहे, त्यातील मजकूर बरोबर आहे व **ती तक्रार निशाणी क्रमांक ४९ वर आहे**. प्रथम खबर अहवाल आता मला दाखवला,त्यावर माझी सही आहे, त्यातील मजकूर बरोबर आहे व **तो निशाणी क्रमांक ५० वर आहे**. त्यानंतर मी दुस-या दिवशी तपास अधिका-यांना घटनास्थळ दाखविले. पोलीसांनी माझे बयान नोंदविले होते. आरोपी आज न्यायालयामध्ये हजर आहे.

<u>उलट तपासणी आरोपींचे वकील श्री. एस. एस. झामड यांचे मार्फत सुरु –</u>

२. विवेक दरवरे च्या घरापासून पोलीस स्टेशनचे अंतर अंदाजे सातशे ते आठशे मिटर आहे. विवेक दरवरे यांच्या घरापासून मोटारसायकलने दोन मिनीटांमध्ये पोलीस स्टेशनला पोहोचता येते. भारतीय दंड संहितेचे कलम ३५३ अंतर्गत गुन्हा नोंदविण्यापूर्वी आरोपीची वैद्यकीय तपासणी करणे बंधनकारक नाही. हे मला माहिती नाही की आरोपीकडे क्रुझर गाडी तसेच ट्रॅव्हलर गाडी होती. आरोपीचे वडिल हे पोलीस खात्यामध्ये नौकरीला होते व मी त्यांना ओळखतो. हे म्हणणे खरे नाही की सन २०१८ मध्ये आरोपीचे वडील वडकी पोलीस स्टेशनमध्ये कार्यरत होते. मला माहिती नाही की वडकीमध्ये कोणती व कोणाची वाहने प्रवासी वाहतूक करतात. हे म्हणणे खरे आहे की वडकी ते राळेगाव तसेच

वडकी ते हिंगणघाट या रस्त्यावर अवैध प्रवासी वाहतूक करणारी काही वाहने असतात. हे म्हणणे खरे नाही की सन २०१८ च्या सुरुवातीला आरोपीच्या क्रुझर गाडीमध्ये कथितपणे अवैधपणे प्रवासी वाहतूक झाल्याबाबत मी चलान आरोपीला दिली होती. हे म्हणणे खरे आहे की विवेक दरवरे यांच्या घरासमोरील रस्त्यावर वाहतूक चालू असते.

**प्रश्न–** विवेक दरवरे यांच्याकडे क्रुझर व मालवाहू गाड्या आहेत ?

**उत्तर–** त्यांच्या घरासमोर त्या गाड्या उभ्या दिसतात.

३. हे म्हणणे खरे नाही की क्रुझर गाडीचा हप्ता देण्याबाबत, माझ्यामध्ये व आरोपीमध्ये तथाकथित घटनेच्या आठ दिवसा अगोदर वाद झाला होता. साक्षीदार अरबाज खान याला मी ओळखतो. अरबाज खान ऑटो चालवितो किंवा नाही हे मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की मी सांगीतल्याप्रमाणे कोणतीही घटना घडली नाही. हे म्हणणे खरे आहे की कथित घटनेच्या दिवशी आरोपीमध्ये व अरबाज खान मध्ये वाद झाला होता. हे म्हणणे खरे आहे की अरबाज खान ने त्या वादाबाबत आरोपीच्या विरोधात पोलीस स्टेशनमध्ये कैफियत दिली. हे म्हणणे खरे नाही की त्या वादाबाबत अरबाज खान व त्याच्या काकाने आरोपीला पोलीस स्टेशनमध्ये आणले होते. मला माहिती नाही की अरबाज खान ने कैफियत देईपर्यंत आरोपी पोलीस स्टेशनमध्ये बसलेला होता. हे म्हणणे खरे नाही की आरोपी पोलीस स्टेशनमध्ये बसलेला असतांना मी आरोपीकडून क्रुझरच्या हप्त्याची मागणी केली.हे म्हणणे खरे नाही की आरोपीने हप्ता दिला नाही व त्यामुळे मी आरोपीच्या विरोधात खोटी कैफियत दिली.

४. हे म्हणणे खरे नाही की मी त्यादिवशी कर्तव्यावर हजर नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की कथित घटनेच्या दिवशी माझी व आरोपीची भेट पोलीस स्टेशनच्या बाहेर झाली नव्हती व त्यामुळे आरोपीने मला हात दाखवून थांबविण्याचा, शिवीगाळ व धमकी देण्याचा, दगड घेवून मारण्यास येण्याचा प्रश्नच उध्दभवत नाही. हे म्हणणे खरे नाही की मी सरतपासणीमध्ये सांगीतल्याप्रमाणे कोणतीही घटना घडली नाही. हे म्हणणे खरे आहे की मी

या प्रकरणामध्ये तपास अधिकारी नाही. हे म्हणणे खरे नाही की खोटे सांगत आहे की आरोपी दारु पिलेला होता. हे म्हणणे खरे नाही की मी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपासणी संपली**.

**फेरतपासणी काही नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृत**

(पी.एस.इंगळे)
दिनांक – २१/०२/२०२६ अतिरिक्त सत्र न्यायाधीश, यवतमाळ.